पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक: नस/९/कावि/४७४/२०१७
दिनांक : ११/१२/२०१७

प्रति,

मा. ..................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महापालिका सभा दिनांक २०/१२/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत.

मा.महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे डिसेंबर -२०१७ ची मासिक मा.महापालिका सभा बुधवार दिनांक २०/१२/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.</u>

**सूचना**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे अनुसूची प्रकरण २ मधील
नियम क्रमांक १ (ए) (एच) (आय) अन्वये )

**<u>कार्यपत्रिका क्रमांक - ११</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे डिसेंबर-२०१७ ची मासिक मा.महापालिका सभा बुधवार दिनांक २०/१२/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

------

मा.महापालिका सभा क्र-०८ दि.२०/९/२०१७ व दि.१६/१०/२०१७ (दु.१.०० वा.) चा सभावृत्तांत कायम करणे.

----------

**<u>प्रश्नोत्तरे</u>**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये )

------

**<u>मा.स्थायी समितीचे ठराव</u>**

**विषय क्रमांक १)** संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.हक्षेका/प्रशा/१/कावि/३३३/२०१७ दि.०९/११/२०१७
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१३०१ दि.१५/११/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे निळू फुले नाट्यगृह, पिंपळे गुरव येथे बांधून तयार आहे. सदर नाट्यगृहाचे मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते औपचारीक उदघाटन झालेले आहे. सदरचे नाट्यगृह भुमी व जिंदगी विभागाकडे हस्तांतरीत होणेस सुमारे १ महिना कालावधी लागणार आहे तोपर्यंत मागणीनुसार होणारे कार्यक्रम महानगरपालिकेच्या प्रेक्षागृह/नाट्यगृहासाठी मनपाने तयार केलेले धोरण व नियमावलीस अनुसरून अंकुशराव लांडगे नाट्यगृह, भोसरी यांचे भाडेदराचे ५० टक्के जादा दराने प्रस्तावा सोबतचे परिशिष्ठ अ व ब प्रमाणे निळू फुले नाट्यगृहासाठी कार्यक्रमाचे दर मंजुर करणेबाबत व नाटयगृह हस्तातंरीत झालेनंतर सदरचे कार्यक्रमाचे भाडेदर कायम करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक २)** संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.नरवि/कावि/१५/२८६/२०१७ दि,५/१२/२०१७
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१५३७ दि.७/१२/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जून्या हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस १८९३/१२७६/प्र.क्र.१७४/९३/नवि-१३, दिः- १८/९/१९९५ अन्वये मंजूर आहे. तसेच पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस १८९३/१४१२/नवि-१३, दिः- २८/११/१९९५ अन्वये मंजूर आहे. तदनंतर महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. पीसीएन १६९७/९३४/प्र.क्र.८९/नवि-२२, दिः- १५/११/१९९७ अन्वये पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे नियोजन नियंत्रणाखालील क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रणाखाली वर्ग करण्यात आले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे एकूण ८६ चौ.कि.मी. नियोजन क्षेत्रासाठी विकास योजना तयार करण्यात आली होती. उक्त विकास योजनेच्या नियोजन क्षेत्रात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सुमारे १२.५२ चौ.कि.मी. क्षेत्र ही समाविष्ट होते. आता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जून्या हद्दीची विकास योजना पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या नियोजन क्षेत्रासह संयुक्तपणे सुधारित करावयाची आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मूळ हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस १२९३/१२७६/प्र.क्र.१७४/९३/नवि-९३, दिः- १८/९/१९९५ अन्वये मंजूर असून पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे क्षेत्र संलग्न असल्याने विकास योजना विषयक प्रस्तावाचे नियोजन एकत्रितपणे करणे संयुक्तिक ठरेल तसेच सदर घटकाचा आस्थापना व इतर अनुषंगिक खर्चही दोन्ही कार्यालयानी प्रत्येकी ५० टक्के प्रमाणे केल्यास त्याचा भार प्रत्येकी कमी होणार असल्याने महानगरपालिकेचे अभिप्राय मा. संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिः- २७/११/२०१३ रोजीचे पत्रान्वये अपेक्षिले होते. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मा. महापालिका सभा ठराव क्र. ४०८, दिः- २१/११/२०१३ यास अनुसरुन महानगरपालिकेची संमती दर्शविली होती.पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणासाठी विकास योजना तयार करण्याकामी उपसंचालक, नगररचना यांच्या अधिपत्याखालील १८ अस्थायी पदांचे विकास योजना विशेष घटकाचे कार्यालय कार्यान्वित करण्याबाबतचा प्रस्ताव मा. संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनास दिः- ०३/४/२०१४ रोजीचे पत्रान्वये सादर केला आहे.तथापी अद्यापपर्यंत शासनामार्फत विकास योजना घटकाची नेमणूक करण्यात आलेली नाही.

तसेच उपरोक्त संदर्भिय ठरावान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महापालिका सभेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २५ अन्वये जून्या हद्दीचे

विकास योजना क्षेत्रासाठी सर्व्हेक्षण करुन विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करण्याचे काम खाजगी संस्थेमार्फत करुन घेण्यास, त्याकामाची निविदा प्रसिध्द करण्यास प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्याप्रमाणे उक्त कामाची निविदा महापालिकने प्रसिध्द केली असता, निविदा स्विकृतीचे कालावधीत मे. ऑल इंडिया इंस्टिट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्मेंट, पुणे यांची एकच निविदा महापालिकेस प्राप्त झाली. वाढीव मुदतीत देखील अन्य कोणात्याही संस्थेने मनपाकडे निविदा सादर केली नसल्याने सदरची निविदा रद्द करण्यात आली आणि या कामाची फेर निविदा प्रसिध्द करण्यात आली. सदर फेर निविदेच्या अनुषंगाने वाढीव मुदत देऊन देखील फक्त दोन संस्थांनी निविदा दाखल केल्या आहेत.

मा. प्रधान सचिव ( नवि-१) यांनी दिः- २०/६/२०१७ रोजीचे अर्धशासकीय पत्रान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेने नुकताच विकास आराखडा सुधारित केला आहे. विकास योजना अद्यावत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तयार करण्याचे कामाचा त्यांचा अनुभव पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस निश्चितपणे होईल. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सदर तंत्रज्ञान व अनुभवाचा उपयोग करुन घेऊन विकास योजना सुधारित करण्याकामी त्यांचा विचार निश्चित करावा असे कळविले आहे. त्याअनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रतिनिधींशी विकास योजना सुधारित करण्याच्या कामाची सविस्तर चर्चा करुन त्यांना विकास योजना तयार करण्याचे संपुर्ण कामासाठी अवलंबण्यात येणारी कार्यपध्दती, अंदाजित खर्च व कालमर्यादा याबाबत सविस्तर प्रस्ताव देण्याचे सुचविले असता त्यांनी दिः- ३१/१०/२०१७ रोजीचे पत्रान्वये त्याबाबत सविस्तर प्रस्ताव मनपास दिला आहे.

अशा परिस्थितीत जून्या हद्दीची मंजूर विकास योजना दुस-यांदा सुधारित करण्याकामी विद्यमान जमिन वापर (ELU) नकाशा तयार करण्याचे कामासाठीचे निविदा प्रक्रियेत प्राप्त झालेल्या दोन निविदा उघडून पुढील रितसर प्रक्रिया करुन यशस्वी निविदाधारकाकडून कामकाज करुन घेणे अथवा बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिः- ३१/१०/२०१७ अन्वये दिलेला प्रारुप विकास योजना ( Draft Development Plan) तयार करुन शासनास सादर करण्यापर्यंतचे सर्व कामकाज बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करुन घ्यावे याबाबत धोरणात्मक निर्णय घेणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

--------

## मा.विधी समिती समितीचे ठराव

**विषय क्रमांक ३)** संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशासन/१/कावि/६१४/२०१७, दि.२३/०८/२०१७

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२४ दि. ८/०९/२०१७

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.७८ दि.१६/१०/२०१७

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.१०३ दि.२८/११/२०१७

आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर आदेश क्र.प्रशा/१/कावि/३७७/२०१५, दि.२८/०४/२०१५ अन्वये डॉ.के.अनिल रॉय यांची पदोन्नती समितीची मान्यता व मा.महापालिका सभा ठराव क्र.५०३,

दि.०५/०७/२०१४ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार करण्यात आलेल्या नेमणुकीच्या अनुषंगाने शासन मान्यतेकामी सादर करण्यात आलेल्या क्र.प्रशा/१/कावि/४३२/१५, दि.१५/०५/२०१५ प्रमाणेच्या मूळ प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.उपसचिव (नवि-२२) यांनी पत्र क्र.पीसीसी-३०१५/प्र.क्र.३५०/नवि-२२, दि.१४ मार्च २०१७ अन्वये महापालिकेस खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

**1)** आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद उपलब्ध झाल्याच्या दिनांकास पदोन्नतीसाठी उपलब्ध अधिका-यांची अर्हता, सेवाज्येष्ठता या सर्व बाबींचा विचार करता, आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावरील पदोन्नतीबाबत महापालिकेच्या दि.१५/०५/२०१५ च्या प्रस्तावास मान्यता देणे योग्य ठरणार नाही.

**2)** प्रस्तुत प्रकरणी पद उपलब्ध झाल्याच्या दिनांकापासून डॉ.अनिल रॉय व डॉ.पवन साळवे यांची पात्रता व सेवाज्येष्ठता तपासण्यासाठी सदर प्रकरण पदोन्नती समितीसमोर पुन्हा ठेऊन त्यावर फेरनिर्णय घेण्यात यावा. तद्नंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५ (४) मधील तरतुदींनुसार शासन स्तरावर आवश्यक तो निर्णय घेण्यात येईल.

त्यानुसार उपरोक्त बाबींवर निर्णय घेण्याकामी दि.२८/०७/२०१७ रोजी समिती सभा आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या समितीने प्रशासन विभागाने सादर केलेला प्रस्ताव व शासनाचे निर्देश विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**1)** डॉ.नागकुमार कुणचगी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे दि.३०/०४/२०११ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेने महापालिका आस्थापनेवरील आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद दि.०१/०५/२०११ पासून रिक्त झाले आहे.

**2)** महापालिका आस्थापनेवरील वैद्यकीय अधिका-यांमध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदोन्नतीकरीता आवश्यक असणारी अर्हता विचारात घेऊन डॉ.अय्यर राजशेखर, वैद्यकीय संचालक (शैक्षणिक अर्हता - एम.बी.बी.एस., डी.पी.एच.) यांच्याकडे दि.०१/०५/२०११ पासून अतिरिक्त पदभार सोपविण्यात आलेला आहे.

**3)** डॉ.अय्यर राजशेखर,वैद्यकीय संचालक हे दि.३१/०५/२०१२ रोजी नियत वयोमानानुसार महापालिका सेवेतून सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यामुळे दि.०१/०६/२०१२ रोजी वैद्यकीय संचालक या पदाबरोबर आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद रिक्त झालेले आहे.

**4)** दि.०१/०६/२०१२ रोजी वैद्यकीय आस्थापनेवर आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता विचारात घेता, डॉ.पवन साळवे,वैद्यकीय अधिकारी हे एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम. ही अर्हता धारक अधिकारी उपलब्ध होते.

**5)** दरम्यान रिक्त असलेले वैद्यकीय संचालक या अभिनामाचे पद पदोन्नतीने भरण्याबाबत दि.१६/०८/२०१२ रोजी आयोजित पदोन्नती समिती सभेने यशवंतराव चव्हाण स्मृती

रुग्णालयाकरीता वैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक आणि वैद्यकीय उपअधिक्षक ही तीनही पदे एकाच वेतनश्रेणीत असल्याने वैद्यकीय संचालक हे पद पदोन्नतीने न भरण्याबाबत निर्णय घेतला. तथापि वैद्यकीय विभागासाठी असलेली आरोग्य वैद्यकीय अधिकारी आणि अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी ही एकाच वेतनश्रेणीत, एकाच शैक्षणिक अर्हतेमध्ये आणि कर्तव्ये व जबाबदा-या समान असल्याने पदाकरीता आवश्यक असणारी एम.बी.बी.एस. आणि डी.पी.एच. ही शैक्षणिक अर्हता धारण करणारे एकमेव वैद्यकीय अधिकारी डॉ.पवन वसंत साळवे (एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम.) यांना अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्याकामी दि.१६/०८/२०१२ च्या समितीने शिफारस केलेली होती. त्यानुसार आदेश क्र.प्रशा/१/कावि/९८८/१२, दि.१७/०९/२०१२ अन्वये डॉ.साळवे पवन यांना अति. आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे.

**6)** डॉ.के.अनिल रॉय यांनी डी.पी.एच. अर्हता दि.३०/०५/२०१३ रोजी धारण केलेली आहे. दि.३१/०५/२०१३ रोजी आयोजित पदोन्नती समितीने वैद्यकीय अधिका-यांची शैक्षणिक अर्हता व सेवाज्येष्ठता तपासून डॉ.के.अनिल रॉय (शैक्षणिक अर्हता - एम.बी.बी.एस.,डी.पी.एच) यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्याबाबत शिफारस केलेली आहे. त्यानुसार पदोन्नती समितीची शिफारस, मा.महापालिका सभेची मान्यता व शासन मार्गदर्शन यांनुसार दि.२८/०४/२०१५ च्या आदेशान्वये डॉ.के.अनिल रॉय यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे. शासन निर्देशानुसार आरोग्य वैद्यकीय अधिकारी पद उपलब्ध झाल्याच्या दिनांका रोजी (दि.०१/०५/२०११) डॉ. अय्यर राजशेखर (एम.बी.बी.एस., डी.पी.एच) व डॉ.साळवे पवन (एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम.) हे आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदाकरीता पदोन्नतीकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करीत होते. तसेच डॉ.अय्यर सेवानिवृत्त झाल्यानंतर दि.०१/०६/२०१२ रोजी डॉ. साळवे हे पदोन्नतीकरीता आवश्यक अर्हता धारण केलेले एकमेव वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होते. सदर दिनांकास डॉ.के.अनिल रॉय हे डी.पी.एच ही शैक्षणिक अर्हता धारण करीत नव्हते. त्यामुळे डॉ.साळवे यांचा आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीकरीता विचार करणे आवश्यक होते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (१) नुसार मा.महापालिका सभा ही नियुक्ती प्राधिकारी असल्याने सदरची बाब निर्णयाकामी/मान्यतेकामी मा.विधी समितीमार्फत मा.महापालिका सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यास प्रस्तुतची समिती सर्वानुमते शिफारस करीत आहे. सबब, मा.उपसचिव (नवि-२२) यांनी पत्र क्र. पीसीसी-३०१५/प्र.क्र.३५०/नवि-२२, दि.१४ मार्च २०१७ अन्वये महापालिकेस प्राप्त निर्देश, दि.२८/०७/२०१७ च्या समितीची शिफारस या बाबी विचारात घेऊन महापालिका आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीबाबत निर्णय घेण्याकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करण्याबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव असलातरी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग (नवि-२२) यांचेकडील पत्र क्र.पीसीसी-३०१५/प्रक्र३५०/नवि-२२, दि.१४ मार्च २०१७ अन्वये महापालिकेस प्राप्त निर्देश आणि दिनांक २८/७/२०१७ रोजीच्या पदोन्नती समितीचा निर्णय व शिफारस विचारात घेऊन आरोग्य वैद्यकीय अधिकारी पद पदोन्नतीसाठी उपलब्ध झालेचे दिनांक रोजी (दि.१/५/२०११) डॉ.अय्यर राजशेखर (एम.बी.बी.एस., डी.पी.एच.) व डॉ.पवन साळवे (एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम.) हे आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदाकरीता पदोन्नतीकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करीत होते. तसेच डॉ.अय्यर सेवानिवृत्त झाल्यानंतर दि.१/६/२०१२ रोजी डॉ.पवन वसंत

साळवे हे पदोन्नतीकरीता आवश्यक अर्हता धारण केलेले एकमेव वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होते. सदर दिनांकास डॉ.के.अनिल रॉय हे डी.पी.एच. ही शैक्षणिक अर्हता धारण करीत नव्हते. त्यामुळे डॉ.पवन वसंत साळवे यांचा आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नती करीता विचार करणे आवश्यक होते. ही वस्तुस्थिती विचारात घेता नियुक्ती प्राधिकारी म्हणून पुर्वीचे या पदासंबंधीचे सर्व निर्णय अधिक्रमित करुन आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर डॉ.पवन वसंत साळवे (एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम.) यांची पदोन्नतीने नेमणूक करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**(टिप-** माहे डिसें. -२०१७ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे**)**

**विषय क्रमांक – ४)** संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.प्रशा/२/कावि/७९६/२०१७, दि.०१/११/२०१७
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.४५ दि.६/११/२०१७
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.१०६ दि.२८/११/२०१७

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ हा राज्यात ०१/०४/२०१० पासून अंमलात आला आहे. सदर अधिनियमामुळे मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण अधिनियम १९५२ आणि मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण अधिनियम १९५६, निरसित करण्याकरीता व तत्संबंधित किंवा तदुनषांगिक बाबींकरीता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे अधिनियम दि. २६/०६/२०१४ अन्वये निर्गमित केलेले असून सदरच्या अधिनियमास मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) अधिनियम २०१३ असे संबोधण्यात आले असून सदर अधिनियम दि.०१/०७/२०१३ पासून अंमलात आला आहे. सदर अधिनियमातील कलम ३ (२) (क) नुसार "निरसित अधिनियमांन्वये व त्याखाली केलेल्या नियमांन्वये घटित केलेली शाळा मंडळे, स्थानिक समित्या किंवा इतर कोणत्याही समित्या किंवा मंडळे त्यांचा संबंधीत पदावधी समाप्त झाल्यानंतर विसर्जित होतील आणि सदस्य आपली पदे रिक्त करतील अशी शाळा मंडळे स्थानिक समित्या किंवा इतर कोणत्याही समित्या किंवा मंडळे ही स्थानिक प्राधिकरणाच्या अधीक्षण, निदेश व नियंत्रणाखाली काम करतील. "म्हणजेच सध्यस्थितीत ज्या शिक्षण मंडळाचा कालावधी पूर्ण झालेला आहे, ती मंडळे विसर्जित होतील व सदस्य आपली पदे रिक्त करतील. ज्या मंडळाचा पदावधी समाप्त झालेला नाही, ती मंडळे पदावधी समाप्त होईपर्यंत कार्यरत राहतील तथापि अशी मंडळे स्थानिक प्राधिकरणाच्या अधीक्षण,निर्देश आणि नियंत्रणाखाली काम करतील अशी स्पष्ट तरतूद आहे. उपरोक्त अधिनियम निरसित झाल्यामुळे यापुर्वी शिक्षण मंडळांना प्रदान करण्यात आलेले सर्व अधिकार आपोआप संपुष्टात आलेले आहेत. त्यामुळे या अधिनियमातील कलम ३(२) (ख)

पुढीलप्रमाणे आहे. “ संबंधित स्थानिक प्राधिकरणास, अशा प्राधिकरणाच्या आवश्यकतेप्रमाणे व त्याला लागू असलेल्या कायद्याच्या तरतूदीनुसार, शाळा, मंडळे, स्थानिक समित्या किंवा इतर कोणत्याही समित्या किंवा मंडळे घटित करता येतील” म्हणजेच स्थानिक प्राधिकरणाला त्यांना लागू असलेल्या कायद्यानुसार आवश्यकतेप्रमाणे समित्या स्थापन करता येतील अशी तरतूद आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३० (१) अन्वये “महानगरपालिकेस, वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून ( महिला व बालकल्याण समितीसह) विशेष समित्यांची नेमणूक करता येईल. अशा समित्यांनी महानगरपालिका त्यांना वेळोवेळी जे अनुदेश देईल ते पाळले पाहिजेत” अशी तरतूद आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभाकामकाज नियमावलीतील (मा.महापालिका सभा, विविध विषय समिती कामकाज व मा.महापौर, मा.उपमहापौर इ. निवडणूकींचे ) नियम ६७ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३० अ नुसार आवश्यकता भासेल त्याप्रमाणे महानगरपालिकेस खाली नमूद केलेल्या विशेष समित्यांपैकी एक किंवा जास्त विशेष समित्या नेमता येतील.

अ) स्थापत्य समिती – सार्वजनिक बांधकाम समिती
ब) वैद्यकीय सहाय्य आणि आरोग्य समिती.
क) विधी समिती – कायदा, महसूल आणि सर्वसाधारण प्रयोजन समिती.
ड) शहर सुधारणा – सुधार समिती.
इ) माध्यमिक, पुर्वप्राथमिक शाळा आणि तांत्रिक समिती.
फ) गलिच्छ वस्ती सुधार, गृहनिर्माण आणि समाजकल्याण समिती

तसेच सभाकामकाज नियमावलीतील नियम ७० नुसार – “ प्रत्येक विशेष समितीवर ०९ (नऊ) महानगरपालिका सदस्य असतील ” अशी तरतूद आहे. “बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९” च्या कलम -९ प्रमाणे प्रत्येक **स्थानिक प्राधिकरणाने (Local Authority)** त्यांचे भौगोलिक क्षेत्रामध्ये असणा-या सर्व शाळांबाबत (सर्व व्यवस्थापन, सर्व माध्यम / सर्व परिक्षा मंडळे, खाजगी अनुदानित, खाजगी विना अनुदानित इत्यादी) खालील जबाबदारी पार पाडणे आवश्यक राहील.

१. (क) प्रत्येक ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकास मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरविणे.

२. (ख) कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे नजिकच्या शाळेच्या उपलब्धतेची सुनिश्चिती करणे.

३. (ग) वंचित व दुर्बल घटकातील बालकांस कोणत्याही कारणावरून प्राथमिक शिक्षण घेण्यापासून ते पुर्ण करण्यापासून त्यास प्रतिबंध केला जाणार नाही. याची

सुनिश्चिती करणे.

४. (घ) त्याच्या अधिकार क्षेत्रात राहणा-या चौदा वर्षे वयापर्यंतच्या बालकांचा अभिलेख विहित करण्यात येईल अशा रितीने ठेवणे.

५. (ड) त्याच्या अधिकार क्षेत्रात राहणा-या प्रत्येक बालकाच्या शाळा प्रवेशाची, उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची खातरजमा करून त्याचे संनियंत्रण करणे.

६. (च) शाळेची इमारत, अध्यापन कर्मचारी वर्ग आणि अध्यापन साधन सामग्री तसेच पायाभुत सुविधा पुरविणे.

७. (छ) कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेली विशेष प्रशिक्षण सुविधा पुरविणे आणि स्थलांतरीत कुटुंबातील बालकांचा प्रवेश सुनिश्चित करणे.

८. (ज) अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली मानके व निकष यांना अनुरुप असणा-या उत्तम दर्जाच्या प्राथमिक शिक्षणाची सुनिश्चिती करणे.

९. (झ) प्राथमिक शिक्षणासाठी अभ्यासक्रम व स्वाध्याय ( पाठ्यक्रम) वेळेवर विहित करण्याची खातरजमा करणे

१०. (त्र) शिक्षकांसाठी प्रशिक्षण सुविधा पुरविणे.

११. (थ) त्याच्या अधिकार क्षेत्रातील शाळांच्या कामकाजाचे संनियंत्रण करणे.

१२. स्थलांतरित कुटुंबातील मुलांना शाळांमध्ये प्रवेश देणे.

१३. शैक्षणिक दिनदर्शिका ठरविणे.

उपरोक्त नमूद जबाबदा-यां सोबत शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :आरटीई २०१३/प्र.क्र.२०/प्राशि-१ दिनांक ३१ डिसेंबर, २०१३ व “बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९”, स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्ये संदर्भातील शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक : आरटीई-१११४/प्र.क्र.११९/एम एम- १ दिनांक २० ऑगस्ट, २०१४ मध्ये नमूद केलेली कर्तव्ये/जबाबदारी व कार्य स्थानिक प्राधिकरण यांनी पार पाडणे आवश्यक आहे. मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) अधिनियम २०१३, मधील कलम ३(२)(ग) चे तरतुदीनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळ विभागाचे अखत्यारित असलेल्या सर्व प्राथमिक शाळांच्या इमारती, सर्व स्थावर व जंगम मालमत्ता, विविध बँकेतील खाती शिक्षण मंडळ कार्यालयाने महापालिकेकडे वर्ग करणेबाबतचा आदेश क्र.प्रशा/२/कावि/२७१/२०१७ दि.१४/०६/२०१७ निर्गत केलेला आहे. सबब, मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) अधिनियम, २०१३, चे कलम ३(२) (ख), महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियमातील नियम ३०(१), पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभा कामकाज नियमावलीतील (मा.महापालिका सभा, विविध विषय समिती कामकाज व मा.महापौर, मा.उपमहापौर इ. निवडणूकींचे नियम) नियम ६७ अन्वये समिती निर्माण करणे तसेच वरील प्रमाणेचे स्थानिक प्रधिकरणाचे कामकाज शिक्षण समितीकडे देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**(टिप-** माहे डिसें. -२०१७ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे**)**

**विषय क्रमांक – ५)** संदर्भ – १) मा.अश्विनी जाधव, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव –
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.४६ दि.६/११/२०१७
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.१०७ दि.२८/११/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शासनाचे निर्देशानुसार शिक्षण समिती स्थापन करण्याकरिता मा.महापालिका सभेपुढे स्वतंत्रपणे विषयपत्र सादर केले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० (१) अन्वये महानगरपालिकेस वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून विशेष समित्यांची नेमणूक करता येईल अशी तरतूद आहे. शिक्षण समितीची कार्यकक्षा इतर विशेष समित्यांपेक्षा वेगळी असून विद्यार्थ्यांचे शिक्षणा संबधीत असल्याने शिक्षण क्षेत्रातील / सामाजिक क्षेत्रातील काही तज्ञांना शिक्षण समितीमध्ये सदस्यत्व दिल्यास शिक्षण समितीचे कामकाज दर्जेदार होण्यास मदत होणार आहे. तरी सध्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० नुसार “ शिक्षण समिती ” स्थापन करण्यास आणि शासन मान्यतेने शिक्षण समितीमध्ये प्रभाग समित्यांचे धर्तीवर पालिका सदस्यांशिवाय महापालिका हद्दीतील शिक्षण क्षेत्रात/सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणा-या आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम १९५० खाली नोंदणीकृत समाजाधिष्ठित अशासकीय संघटनेचा पदाधिकारी म्हणून किमान ३ वर्षांचा अनुभव असलेले ४ पेक्षा अधिक नसतील इतक्या संख्येतील इतर सदस्यांची शिक्षण समितीवर राज्य शासन विहित करील त्याप्रमाणे नेमणूक करणेकामी राज्य शासनाची मान्यता घेणेकामी शिफारस करण्याकरिता मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**(टिप-** माहे डिसें. -२०१७ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे**)**

**विषय क्रमांक – ६)** संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.प्रशा/१/कावि/७४८/२०१७, दि.२९/०९/२०१७
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.५६ दि.२/१२/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर वैद्यकीय उपअधिक्षकअभिनामाचे एकमेव पद पे बॅन्ड र.रु. १५६००-३९१०० ग्रेड पे र.रु. ७६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहे. शासन पत्र क्र.पीएमसी-३०९७/१५६९/प्र.क्र.२५९/९८/नवि-२२, दि.२९ जून २००१ नुसार वैद्यकीय उपअधिक्षक पदावरील पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता निश्चित करण्यात आलेली आहे. "महापालिका सेवेतील वैद्यकीय शाखेकडील वर्ग २ मधील ज्येष्ठ अधिका-यांमधून की, त्यांनी सांविधिक विद्यापीठाची वैद्यकीय शाखेची पदव्युत्तर पदवी अथवा मेडीकल कौन्सिल ऑफ इंडिया यांनी मान्यता दिलेली तत्सम अर्हता धारण केलेली आहे व मोठ्या रुग्णालयामधील कामकाजाचा ५ वर्षापेक्षा जास्त अनुभव आहे." प्रस्तुतचे पद पदोन्नतीने भरण्याकरीता दि.२८/०७/२०१७ रोजी पदोन्नती समिती आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने डॉ.शंकर बळवंत जाधव, फिजिशियन यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल या बाबींची पडताळणी करुन त्यांना पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० या वेतनश्रेणीमध्ये वैद्यकीय उपअधिक्षक या पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत प्रस्तुतच्या समितीने शिफारस केलेली आहे. सबब, डॉ. जाधव शंकर बळवंत, फिजिशियन यांना खुला (अनु.जाती) प्रवर्गामधून पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० या वेतनश्रेणीमध्ये वैद्यकीय उपअधिक्षक या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक – ७)** संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/७४९/२०१७, दि.२९/०९/२०१७

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.५७ दि.२/१२/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी अभिनामाची १६ पदे पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु. ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीकरीता मा.महापालिका सभा ठराव क्र.२७३६, दि.१४/०६/१९९४ नुसार खालीलप्रमाणे अर्हता निश्चित करण्यात आलेली आहे. "पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी की ज्यांची महापालिका सेवेत वैद्यकीय अधिकारी या पदावर वर्ग २ मध्ये १० वर्षे सेवा झालेली आहे" प्रस्तुतच्या संवर्गात रिक्त असणारी/होणारी पदे पदोन्नतीने भरण्याकरीता दि.२८/०७/२०१७ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात

आली होती.प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व वैद्यकीय अधिकारी पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, गोपनीय अहवाल, सेवाज्येष्ठता, आरक्षण आणि मत्ता व दायित्व इ. सेवाविषयक तपशील पडताळून खालीलप्रमाणे अधिका-यांना त्यांचे नावासमोर नमूद प्रवर्गातून पे बॅन्ड र.रु. १५६००-३९१००ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत शिफारस केलेली आहे.

| अ.क्र. | अधिका-याचे नाव | पदोन्नतीचा प्रवर्ग | शेरा |
|---|---|---|---|
| १. | डॉ.भावसार शैलजा मनोज | वि.जा. (अ) | |
| २. | डॉ.ताडे प्रकाश हिंदूराव | अनु. जाती | दि.३०/११/२०१७ रोजी पात्र |
| ३. | डॉ.साळवे सुनिता श्रीरंग | खुला(अनु. जाती) | |
| ४. | डॉ.इंजिनियर सुनिता शिवशंकर | खुला (वि.जा.(अ)) | |
| ५. | डॉ.तिरुमणी संगिता टी. | खुला (इ.मा.व.) | |
| ६. | डॉ.खरात मेघा रविंद्र | खुला (अनु. जाती) | दि.३०/११/२०१७ रोजी पात्र |

त्याचप्रमाणे खुल्या प्रवर्गाची २ पदे रिक्त राहत असलेने महापालिका रुग्णालयीन प्रशासकीय कामकाजाच्या आवश्यकतेच्या दृष्टीने वैद्यकीय अधिकारी पदाचे दि.०१/०१/२०१६ रोजीचे अंतिम सेवाज्येष्ठता सूचीनुसार सेवाज्येष्ठ असलेले डॉ.फिरके राजेंद्र प्रल्हाद यांना खुला(इ.मा.व.) आणि डॉ.गोफणे लक्ष्मण पांडुरंग यांना खुला(भ.ज.(क)) प्रवर्गातून तात्पुरत्या(Ad-hoc) स्वरुपात वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मध्ये ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सबब, डॉ.भावसार शैलजा मनोज, डॉ.ताडे प्रकाश हिंदूराव, डॉ.साळवे सुनिता श्रीरंग, डॉ.इंजिनियर सुनिता शिवशंकर, डॉ.तिरुमणी संगिता टी, आणि डॉ.खरात मेघा रविंद्र यांना त्यांचे नावासमोर उपरोक्त नमूद प्रवर्गातून 'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी'या पदावर र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु. ६६०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता मिळणेबाबत तसेच डॉ.फिरके राजेंद्र प्रल्हाद यांना खुला(इ.मा.व.) आणि डॉ.गोफणे लक्ष्मण पांडुरंग यांना खुला(भ.ज.(क)) प्रवर्गातून तात्पुरत्या (Ad-hoc) स्वरुपात 'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी' या पदावर र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु. ६६०० या वेतनश्रेणी मध्ये पदोन्नती देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक – ८)** संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.स्था/बीआरटीएस/८११/२०१७, दि.१७/११/२०१७

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.५८ दि.२/१२/२०१७

वाकड ते हिंजेवडी मनपा हद्दीपर्यंत बीआरटीएस रस्ता विकसित करणे या कामास मा. मनपा सभा ठराव क्र. **६६३** दि. ०६/०४/२०१५ तसेच मा. आयुक्त यांना दि. ०५/०५/२०१५ ची मंजूर टिपणी अन्वये प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. तसेच सदर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार या कामी मे.इन्फ्राकिंग कन्सल्टिंग इंजिनियर्स प्रा.लि. यांची निविदा पूर्व व निविदा पश्चात कामासाठी मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. **१२३३८** दि. ०१/०९/२०१५ व मा. आयुक्त यांची दि. २३/०३/२०१६ च्या टिपणी अन्वये नेमणूक करणेत आली आहे. सदर कामाची निविदा रक्कम **६,५५,०३,३७२/-** इतकी असून सदर निविदा **५.२५%** कमी दराने मे.एच सी.कटारिया यांना दि. ०४/०३/२०१६ च्या कामाचा आदेशान्वये देण्यात आली आहे. सद्यस्थितीत एकूण कामापैकी ५५% पूर्ण झाले असून उर्वरित काम रस्ता रुंदीकरणाची जागा ताब्यात नसलेने करता येणे शक्य नाही. सदर प्रकरणी भूसंपादन कायदा १८९४ चे अंतर्गत निवाडा दि.२९/०१/२००८ रोजी जाहिर झालेला आहे. सदर चे जाहीर निवाड्यात नमूद केलेनूसार "स.नं. २७६, २७७, २७८ मधील हितसंबंधीतांनी मा.उच्च न्यायालयात दावा दाखल केल्याने व या दाव्यामध्ये मा.न्यायालयाने या मिळकतीचे भूसंपदनासाठी व ताब्यासाठी स्थगिती दिली असल्याने"सदर तीन मिळकती सदर निवाड्यात समाविष्ट केलेल्या नव्हत्या. म्हणजेच स.नं. २७६, २७७, २७८ या मिळकती पैकीचे कलम ६ अन्वये अधिसूचित क्षेत्र, तसेच क्षेत्र दुरुस्तीच्या मिळकती व टीडीआर/एफएसआय च्या बदल्यात ताब्यात घेतलेल्या मिळकतीचे संपादन करावयाचे क्षेत्र वगळून, उर्वरित क्षेत्राचा निवाडा दि.२९/०१/२००८ रोजी जाहीर करण्यात आलेला आहे. त्यामुळे संबंधित जागा मालकांनी रस्त्याचे काम करणेस मनाई केलेली आहे. सदरबाबत विषयांकित निविदा रकमेच्या बचती मधून कालाखडक झोपडपट्टी शेजारील स.नं. १२४ ते वाकड डांगे चौकाकडे जाणारा २४ मी. डी.पी. रस्ता विकसित करणेचे काम सुचविले आहे. तसेच सदर बचती मधून कावेरी नगर, सांगवी फाटा व डांगे चौक येथील रोडचे डांबरीकरण करणेचे नियोजन आहे. सदर कामामधील स्थापत्य, विद्युत, जलनि:सारण व पाणीपुरवठा कामांची एकत्रित बचत र.रु. ३.०० कोटी इतकी आहे. तसेच स.नं. १२४ ते वाकड डांगे चौकाकडे जाणारा २४ मी. डी.पी. रस्ता विकसीत करणेचे कामात कावेरी नगर, सांगवी फाटा व डांगे चौक येथील रोडचे डांबरीकरणाचे काम करणे शक्य आहे. तथापि सदर मुळ निविदेतील प्रस्तावित स्थळावरील काम दुस-या स्थळावर करणेस मा.विधी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी सदर कामातील स्थापत्य, विद्युत, जलनि:सारण व पाणीपुरवठा कामांची एकत्रित बचत र.रु. ३.०० कोटी स्थापत्य वर्ग करून मुळ निविदेतील स्थळ बदलून नवीन स्थळ कालाखडक झोपडपट्टी स.नं. १२४ ते वाकड डांगे चौकाकडे जाणारा २४ मी. डी.पी. रस्ता विकसित करणे तसेच कावेरी नगर,

सांगवी फाटा व डांगे चौक येथील रोडची डांबरीकरण करण्याच्या कामाचा स्थळ बदलाचा प्रस्ताव दसरी दाखल करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

--------

**मा.आयुक्तांकडून आलेली पत्रे/कामे**

**विषय क्रमांक ९)** **संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्वभाअक/३/कावि/३२४/२०१७ दि.७/१२/२०१७

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान"च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालयनाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,८८,९५,०००/- व ९,०७,७५,०००/- असे एकुण र. रु १३,९६,७०,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु.८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/११/२०१७अखेर केलेल्या कार्यवाहीची माहितीखालील प्रमाणे

प्रपत्र “अ”

| महानगरपालिकेचे नाव | | पिंपरी चिंचवड महानगरपालिका | शेरा |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | ११९६५ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | ११२७३ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ९०३३ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | मनपा बांधकाम- ५२०८ | एकुण बांधकाम पुर्ण- ८०६४<br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - २८५६ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ४६५सीटस | महिला–२०३ सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष–२६२ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिलाहप्ता | ६१९३ लाभार्थी | GOI+GOM=३७१.५८ लाख | GOI=२०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१२३.८६ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **४९५.४४लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ५०३८ लाभार्थी | GOI+GOM=३०२.२८ लाख | GOI=२०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१००.७६ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **४०३.०४ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणे.

**विषय क्रमांक १०)** **संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आप/४/कावि/९१२/२०१७ दि.८/१२/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील विद्यमान सन्मा.पदाधिकारी/सदस्य आणि माजी पदाधिकारी / सदस्य यांचे नावाचे फलक त्यांचे निवासस्थानाजवळ लावणेकामी धोरण ठरविणेस मा.स्थायी समिती मध्ये सुचना देणेत आलेल्या आहेत.

सध्या अशाप्रकारचे विद्यमान सन्मा.पदाधिकारी/सदस्य आणि माजी पदाधिकारी / सदस्य यांचे नावाचे फलक त्याचे निवासस्थानाजवळ लावणेबाबतचे निश्चित धोरण नाही.

पुणे महानगरपालिकेमध्ये याबाबत फोनवर चौकशी केली असता तेथेही धोरण ठरविलेले नाही. मात्र नगरसचिव कार्यालयामार्फत संबंधित क्षेत्रिय कार्यालयास सन्मा.सदस्य / पदाधिकारी यांचे नाव व पत्ता यांचे पत्र पाठवुन नावाचा फलक लावणेस सांगितले जाते.

सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अशा प्रकारचे फलक स्थापत्य विभाग क्षेत्रिय कार्यालयामार्फत लावले जातात. मा.स्थायी समिती सभेमध्ये दिलेल्या सुचनांप्रमाणे महानगरपालिकेतील विद्यमान सन्मा.पदाधिकारी/सदस्य आणि माजी पदाधिकारी / सदस्य यांचे नावाचे फलक त्यांचे निवासस्थानाजवळ लावणेकामी धोरण ठरविणेस खालील प्रपत्र अ प्रमाणे असावे

**प्रपत्र अ**

| **अ.क्र** | **धोरण** |
|---|---|
| १ | विद्यामान व माजी सन्मा.पदाधिकारी/सदस्य यांचे नावाचा, त्यांचे निवासस्थानाकडे जाणा-या मुख्य रस्त्याच्या कडेला एक फलक लावणेत यावा. |
| २ | फलक ३ फुट X २ फुट आकाराचा असावा त्याची जमीनीपासुन उंची ७ फुट असावी. |
| ३ | फलक हिरव्या फ्लोरोसंट रंगामध्ये (बॅकग्राऊंड) व त्यावरील मजकुर पांढ-या अक्षरांत असावा. तसेच तो देवनागरी (मराठी) मध्ये असावा. पदाधिकारी/सदस्य यांच्या नावांच्या अक्षरांची उंची १० सेमी व इतर मजकुरांच्या अक्षरांची उंची ७ सेमी इतकी असावी. |
| ४ | विद्यमान व माजी सन्मा.पदाधिकारी / सदस्य यांची नावे व निवासस्थानाचे पत्ते नगरसचिव कार्यालयाने स्थापत्य मुख्य कार्यालयास त्यांचे सदस्य कालावधीसह कळविणेत यावेत. |
| ५ | नावाचे फलक हे विद्यमान व लगतच्या मागील निवडणुकीतील माजी सदस्य यांचे बाबतीत असतील. |

| | |
|---|---|
| ६ | माजी सन्मा.पदाधिकारी/सदस्य यांचे बाबतीत फलक लावताना स्पष्ट उल्लेख करणेत यावा. (उदा माजी नगरसेवक / नगरसदस्य / महापौर / तसेच स्विकृत असलेस स्विकृत नगरसेवक ) असा स्पष्ट उल्लेख असावा.नावापुढे मा,स्वि.अशा प्रकारचा उल्लेख नसावा. |
| ७ | फलक ऑक्रिलीक शिटवर, लोखंडी स्ट्रक्चर मध्ये रस्त्याच्या दर्शनी भागावर लावणेत यावेत. फलक लावताना वाहतुकीस अडथळा होणार नाही पादचा-यांची चालताना गैरसोय होणार नाही.फलकामुळे दृष्यता बाधीत होणार नाही या बाबींची दक्षता घेण्यात यावी.तसेच प्रचलीत कायदा व नियम यांचे पुर्ण पालन करावे. |
| ८ | अशाप्रकारचे फलक लावणेचे कामकाज स्थापत्य मुख्य कार्यालयामार्फत सर्व प्रचलीत नियमांचे पालन करून करणेत यावे. |
| ९ | निवडणुक आचारसंहिता कालावधीमध्ये सदर फलकावरील नाव झाकुन घेणेची कार्यवाही (आचारसंहितेच्या नियमाप्रमाणे ) स्थापत्य विभागाने करावी. |
| १० | फलक लावणेकामी आवश्यक असणारी अंदाजपत्रकीय तरतुद स्थापत्य विभागाकडे असावी. |
| ११ | निवडून आलेल्या नवनिर्वाचीत सदस्यांची नावे राजपत्रामध्ये प्रसिध्द झालेवर त्यांची नावे व पत्ते नगरसचिव विभागाने स्थापत्य विभागाला त्वरीत कळविणेत यावीत व फलक लावणेची कार्यवाही स्थापत्य मुख्य कार्यालयाने पुर्ण करावी. |
| १२ | याव्यतिरिक्त लावण्यात आलेले फलक हे बेकायदेशिर समजून ते काढून टाकण्यात यावेत. |

सबब वरीलप्रमाणे सन्मा. पदाधिकारी/सदस्य आणि माजी पदाधिकारी / सदस्य यांचे नावाचे फलक त्यांचे निवासस्थानाचे मुख्य रस्त्यावर लावणे बाबतचे धोरण ठरविणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

-------

## समित्यांचे अहवाल

## विधी समिती

**विषय क्रमांक ११)** अ) दि. २३/१०/२०१७ व दि.६/११/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दि.०६/११/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणे.
क) दि.१७/११/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणे

--------

## मा.महिला व बालकल्याण समिती

**विषय क्रमांक १२)** अ) दि. ०७/११/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दि.२१/११/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणे.

-----

**<u>मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती</u>**

**विषय क्रमांक १३)** अ) दि. १०/११/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणे.

------

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/९/कावि/४७४/२०१७
दिनांक : ११/१२/२०१७

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्)
नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

(मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.हक्षेका/प्रशा/१/काव/३३३/२०१७ दि.०९/११/२०१७)

(मा.महापालका सभा विषय क्र.१ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी पुणे-४११०१८
निळुफुले नाट्यगृहं ,पिंपळे गुरव पुणे ४११०३४

नाट्यगह भाडेदर तक्ता
परिशिष्ट अ

| अ.क्र. | कार्यक्रमाचे स्वरुप | अंकुशराव लांडगे नाटयगृहाचे सध्याचे भाडेदर | निळुफुले नाटयगृहाचे प्रस्तावित भाडेदर . |
|---|---|---|---|
| १ | अनामत रक्कम | | |
| | अ) नाट्यप्रयोग | ३३००/- | ५०००/- |
| | ब) परिसंवाद स्नेहसंमेलन ,चर्चासत्र इत्यादीसाठी | ६८००/- | १०२००/- |
| | क) ऑर्केस्ट | ११३००/- | १७०००/- |
| | ड) बालनाट्य (दिवाळी व उन्हाळी सुट्ट्यामध्ये) | १२००/- | १८००/- |
| २. | भाडे (प्रेक्षागृह) अ) महिन्याचा दुसरा व चौथा शनिवार,गुरुवार ,रविवार तसेच सार्वजनिक सुट्याचे व सरकारी सुट्टीचे दिवशी | | |
| | १)नाट्यप्रयोग | २७००/- | ४१००/- |
| | २)ऑर्केस्ट्रा | ५६००/- | ८४००/- |
| | ३) अ) परिसंवाद,स्नेहसंमेलन,चर्चासत्र इत्यादी (५ तासांसाठी | ११३००/- | १७०००/- |
| | ब) परिसंवाद,स्नेहसंमेलन,चर्चासत्र इत्यादी (१ दिवसांसाठी) | ३३८००/- | ५०७००/- |
| | ४) बालनाट्य (दिवाळी व उन्हाळी सुट्टयामध्ये) | ७००/- | ११००/- |
| | क) वरील दिवसा व्यतिरिक्त इतर दिवसांचे प्रयोगास | | |
| | १)नाट्यप्रयोग | २१६०/- | ३३००/- |
| | २)ऑर्केस्टा | ४४८०/- | ६८००/- |
| | ३) अ)परिसंवाद,स्नेहसंमेलन,चर्चासत्र इत्यादी (५ तासांसाठी ) | ९०४०/- | १३६००/- |
| | ब)परिसंवाद,स्नेहसंमेलन,चर्चासत्र इत्यादी (१ दिवसांसाठी) | २७०४०/- | ४१०००/- |
| | ४) बालनाट्य (दिवाळी व उन्हाळी सुट्टयामध्ये) | ७००/- | ११००/- |
| ३) | प्रयोगाचे नेहमीचे वेळे व्यतिरिक्त प्रत्येक जादा तासांसाठी विलंब आकार | २००/- | ३००/- |
| ४) | फक्त रंगीत तालीमसाठी (२ तासासाठी सर्वसाधारण प्रकाश योजना) | ७००/- | ११००/- |
| | इतर आकार | | |
| | अ)डोअर किपर व्यवस्था दर प्रयोगास | २५०/- | ४००/- |
| | ब) जाहिरात बोर्ड व्यवस्था दर | १००/- | १५०/- |
| | क) भाडयाचे रक्कमेत रंगमंचावर बेबी स्पॉट लाईट १० नग (१००० वॅट),सायक्लोरामा २ नग (१००० वॅट) पुरविले जाईल ,याशिवाय मिनीफल्ड लाईट २ नग(१००० वॅट) दिले जातील . याव्यतिरिक्त जादा प्रकाश योजना हवी असल्यास प्रत्येक प्रयोगासाठी खालीलप्रमाणे दर प्रति नगास घेतला जाईल. | | |

3

| | | | |
|---|---|---|---|
| | १) बेबी स्पॉट लाईट(१००० वॅट) | ५०/- | ७५/- |
| | २) बेबी स्पॉट लाईट (१००० वॅट) कंपनीने स्वतःचे वापरलेस | ३०/- | ५०/- |
| | ३) सायक्लोरामा / हॅलोजन (१००० वॅट) | ५०/- | ७५/- |
| | ४) सायक्लोरामा/हॅलोजन (१००० वॅट) कंपनीने स्वतःचे वापरल्यास | ३०/- | ५०/- |
| | ५) सायक्लोराम /हॅलोजन(२००० वॅट) | १००/- | १५०/- |
| | ६) सायक्लोरामा /हॅलोजन (२००० वॅट) कंपनाने स्वतःचे वापरल्यास | ५०/- | ७५/- |
| | ७) मिनी फलड लाईट(१००० वॅट) | ५०/- | ७५/- |
| | ८) गिती फलड लाईट (१००० वॅट)कंपनीने स्वतःचे वापरल्यास | ३०/- | ५०/- |
| | ९)प्रोफाईल लाईट (१००० वॅट) | १००/- | १५०/- |
| ५ | १०) प्रोफाईल लाईट (१००० वॅट) कंपनीने स्वतःचे असल्यास | ५०/- | ७५/- |
| | ११) प्रेशनल लाईट (१००० वॅट) कंपनीने स्वतःचे असल्यास | १००/- | १५०/- |
| | १२)प्रेशनल स्पॉट लाईट उर्फ सोलर लाईट कंपनीने स्वतःचे वापरल्यास | ५०/- | ७५/- |
| | १३)विंग फ्लो(२००० वॅट) | १५०/- | २५०/- |
| | १४) विंग फ्लो(२०००वॅट) कंपनीने स्वतःचे वापरल्यास | १००/- | १५०/- |
| | १५) डयुअल लाईट (१००० वॅट) | १००/- | १५०/- |
| | १६) डयुअल लाईट (१००० वॅट) कंपनीने स्वतःचे वापरल्यास | ५०/- | ७५/- |
| | १७) पारकर लाईट (१००० वॅट) | १००/- | १५०/- |
| | १८) पारकर लाईट(१००० वॅट)कंपनीने स्वतःचे वापरल्यास | ५०/- | ७५/- |
| | **स्टेजवरील प्रॉपर्टी** | | |
| | अ)महाल (पुर्ण सेट) | १५०/- | २५०/- |
| ६ | ब)फ्लॅठ (पुर्ण सेट) | १५०/- | २५०/- |
| | क)स्टेअर केस (पुर्ण सेट) | १५०/- | २५०/- |
| | ड)लेव्हल (फोल्डांग फर्टिफॉर्म)प्रति नग | ३०/- | ५०/- |
| ७ | कार्यक्रम टेप करावयाचे आकार | १००/- | १५०/- |
| ८ | कार्यक्रमाचे व्ही.डी.को.शुटींग आकार | ३००/- | ४५०/- |
| ९ | व्ही.आय.पी.चा वापर आकार | १५०/- | २५०/- |
| १० | प्रयोग हस्तांतर झालेल्या हस्तांतरण फी | ४५००/- | ६८००/- |
| ११ | मोकळा बार | ३०/- | ५०/- |
| १२ | पडदा | ३०/- | ५०/- |
| १३ | टेबल प्रती नग | ५०/- | ७५/- |
| १४ | खुर्ची प्रती नग | १०/- | २०/- |
| १५ | सोफा प्रती नग | १५०/- | २५०/- |
| १६ | कॉर्डलेस  माईक | ६००/- | ९००/- |
| १७ | कॉडलेस कंपनीचा माईक | ३००/- | ४५०/- |
| १८ | इको चेंबर्स | ६००/- | ९००/- |
| १९ | निवासी व्यवस्था प्रती रुम | ५००/- | ७५०/- |
| २० | प्रोजेक्टर कंपनी | ३००/- | ४५०/- |
| २१ | मिक्सर कंपनी | ७०/- | १००/- |
| २२ | एमप्ली फायर कंपनी | ७०/- | १००/- |
| २३ | लॅपटॉप कंपनी | ७०/- | १००/- |
| २४ | कॉम्प्युटर मॉनीटर कंपनी | ७०/- | १००/- |
| २५ | सिडी प्लेअर मनपा कंपनी किंवा कंपनी | ७०/- | १००/- |
| २६ | एलसीडी कंपनी | ७०/- | १००/- |

4

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | इस्त्री | २५/- | ५०/- |
| २८ | स्मोक मशिन | ५०/- | ७५/- |
| २९ | कॉलर माईक | ६००/- | ९००/- |
| ३० | कॉलर कंपनी | ३००/- | ४५०/- |
| ३१ | फॉलो लाईट | ७०/- | १००/- |
| ३२ | लेझर लाईट | ५०/- | ७५/- |
| ३३ | स्टायमर | ७०/- | १००/- |

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी पुणे-४११०१८
निळुफुले नाट्यगृह ,पिंपळे गुरव पुणे ४११०३४
नाट्यगृह भाडे तक्ता
परिशिष्ट ब
गुरुवार दुसरा व चौथा शनिवार,रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी
दि.01/07/2017 पासुन 18% जी एस टी लागु

| कार्यक्रमाचे भाडयाचे स्वरुप . | अनामत रक्कम | प्रेक्षागृह भाडे | व्दार पालन | फलक बोर्ड | जीएस टी | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| रंगीत तालीम वेळ स.९ ते ११ | - | 1100 | - | - | 198 | 1298 |
| बालनाट्य वेळ ९ ते ११ | 1800 | 1100 | 400 | 150 | 297 | 1947 |
| नाटक-३ तास | 5000 | 4100 | 400 | 150 | 837 | 5487 |
| इतर-३ तास | 10200 | 8400 | 400 | 150 | 1611 | 10561 |
| ऑर्केस्ट्रा ३ तास | 17000 | 8400 | 400 | 150 | 1611 | 10561 |
| ५ तास | - | 17000 | 800 | 150 | 3231 | 21181 |
| ८ तास | - | 27200 | 1000 | 150 | 5103 | 33453 |
| १० तास | - | 34000 | 1600 | 150 | 6435 | 42185 |
| १२ तास | - | 40800 | 2000 | 150 | 7731 | 50681 |
| १५ तास | - | 50700 | 2400 | 150 | 9585 | 62835 |

इतर दिवसाचे २०% सवलतीचे भाडे

| कार्यक्रमाचे भाडयाचे स्वरुप | अनामत रक्कम | प्रेक्षागृह भाडे | व्दार पालन | फलक बोर्ड | जी एस टी | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| नाटक-३ तास | 5000 | 3300 | 400 | 100 | 684 | 4484 |
| इतर-३ तास | 10200 | 6800 | 400 | 100 | 1314 | 8614 |
| ऑर्केस्ट्रा ३ तास | 17000 | 6800 | 400 | 100 | 1314 | 8614 |
| ५ तास | - | 13600 | 800 | 100 | 2610 | 17110 |
| ८ तास | - | 21760 | 1000 | 100 | 4115 | 26975 |
| १० तास | - | 27200 | 1600 | 100 | 5202 | 34102 |
| १२ तास | - | 32640 | 2000 | 100 | 6253 | 40993 |
| १५ तास | - | 41000 | 2400 | 100 | 7830 | 51330 |

१) संगीत नाटक महिन्यातून फक्त दोन प्रयोगासाठी सवलतीचे भाडे ज्या दिवशी आहे .त्या दिवशी प्रयोग केल्यास भाडे रक्कम रुपये1650+400+100+387=2537 एवढे राहिल.
२)हस्तांतरीत फी -6800/-

आयुक्त